महाराष्ट्र शासन
इतर मागास बहुजन कल्याण विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई
कार्यालय, व्यवस्थापकीय संचालक, महात्मा ज्योतिबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्था
(महाज्योती), महाराष्ट्र राज्य, नागपूर
डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, ३ रा माळा, दिक्षाभूमी रोड, श्रद्धानंद पेठ, नागपूर - ४४० ०२२
दुरध्वनी क्र. ०७१२-२८७०१२०/२१ CIN - U85300PN2019NPL187405 ई-मेल - mahajyotingp@gmail.com

जा.क्र.महाज्योती/नागपूर/आस्था/७३४/२०२५-२६ दि:-१७/०४/२०२६

# परिपत्रक

**विषय :- संघ लोकसेवा आयोग महाराष्ट्र येथील परीक्षा पूर्व प्रशिक्षण २०२५-२६ करिता निवड झालेल्या विद्यार्थांना सूचना.**

सन २०२५-२६ या आर्थिक वर्षात महाज्योती संस्थेमार्फत राबिण्यात येणाऱ्या संघ लोकसेवा आयोग महाराष्ट्र येथील परीक्षा पूर्व प्रशिक्षणाकरिता पात्र विद्यार्थांची विस्तारित यादी महाज्योतीच्या संकेतस्थळावर दि.०२/०२/२०२६ रोजी प्रसिध्द करून निवड झालेल्या विद्यार्थांना युनीक अकॅडेमी पुणे या प्रशिक्षण संस्थेत रुजू होण्याकरिता मुदत देण्यात आलेली होती. तसेच विस्तारित यादीतील निवड झालेल्या विद्यार्थांपैकी जे विद्यार्थी युनीक अकॅडेमी पुणे या प्रशिक्षण संस्थेत अनियमितपणे हजर होते अश्या विद्यार्थांचे प्रवेश रद्द करून सदर विद्यार्थांची यादी देखील महाज्योतीच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेली आहे.

त्यानुसार सदर प्रशिक्षणाकरिता युनीक अकॅडेमी, पुणे या प्रशिक्षण संस्थेत रिक्त असलेल्या जागांकरिता सदर प्रशिक्षणासाठी ज्ञानदीप अकॅडेमी, पुणे या प्रशिक्षण संस्थेकरिता प्रसिध्द करण्यात आलेल्या निवड व प्रतिक्षा यादीतील संबंधित विद्यार्थांना **(यादी संलग्न)** युनीक अकॅडेमी, पुणे प्रशिक्षण संस्था बदल करून देण्यात येत असून सदर विद्यार्थांना दि.१९/०४/२०२६ रोजी पर्यंत युनीक अकॅडेमी या प्रशिक्षण संस्थेत रुजू होण्याकरिता मुदत देण्यात येत आहे. जे विद्यार्थी दि.१९/०४/२०२६ रोजी पर्यंत प्रशिक्षण संस्थेत रुजू होणार नाही अश्या विद्यार्थांची निवड रद्द करण्यात येईल. सर्व संबंधित विद्यार्थांनी याची नोंद घ्यावी.

**स्वा**

**(मिलिंद नारिंगे)**
**व्यवस्थापकीय संचालक**
**महात्मा ज्योतिबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्था,**
**(महाज्योती) महाराष्ट्र राज्य, नागपूर**